INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal

February - 2020 Special Issue - 240 (A)

# Analysis of Maharashtra State Legislative Assembly Election 2019



**Executive Editors :**
Dr. Sandip Tundurwar
(HoD, PG Dept. of Political Science)
Shri. Binzani City College, Nagpur

Dr. Vakil Shaikh
(HoD, Dept. of Political Science)
Taywade College, Mahadula-Koradi, Dist.-Nagpur

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

**Associate Editors :**
Dr. Sanjay Nakade
(HoD, Dept. of Political Science)
Dnyanesh Mahavidyalaya, Nawargaon
Dr. Balasaheb Jogdand
(PG Dept. of Political Science)
Sitabai Arts & Commerce College, Akola
Dr. Amar Bondre
(Dept. of Political Science)
VMV Com. JMT Arts & JJP Sci. College, Nagpur
Dr. Dinkar Chaudhari
(HoD, Dept. of Political Science)
Arts & Commerce College, Bhisi

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCHJOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

SEAL
Principal
Smt Rajkamal Baburao Toxe
Mahavidyalaya Mouda

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 240 (A) : Analysis of Maharashtra State Legislative Assembly 2019
Peer Reviewed-Referred Journal
ISSN : 2348-7143
February-2020

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | पूर्व विदर्भाच्या विधानसभा क्षेत्रातील आमदारांच्या जात व पक्षनिहाय प्रतिनिधित्वाचे विश्लेषणात्मक अध्ययन : २००९ ते २०१९ | डॉ. राहूल बावगे, डॉ. असिम खापरे | 08 |
| 2 | विधानसभा निवडणूक आणि सत्ताकारण | डॉ. व्ही. के. गायकवाड | 22 |
| 3 | महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या सत्ता संघर्षाचा अन्वयार्थ ! | डॉ. प्यारेलाल सूर्यवंशी | 26 |
| 4 | महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २०१९ विश्लेषण : नात्या–गोत्याचे 'कुटुंब कबिल्या''चे सरकार | डॉ. प्रदीप दंदे | 29 |
| 5 | विधानसभा निवडणूक आणि पक्षीय संदर्भ | डॉ. रविंद्र मणगे | 32 |
| 6 | महाराष्ट्र विधानसभा निवडणुक (२०१९) चे विश्लेषण : विशेष संदर्भ – मराठवाडा | प्रा. डॉ. विठ्ठल दहिफळे | 41 |
| 7 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ आणि निवडणूकीनंतरचे राजकारण | डॉ. विलास आघाव | 46 |
| 8 | १४ व्या विधानसभा निवडणूक काळातील बदलती सत्ता समीकरणे | डॉ. व्ही. एस. इंगळे | 50 |
| 9 | निवडणूकांच्या वाढत्या खर्चाचे आव्हान | डॉ. तुषार निकाळजे | 56 |
| 10 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण २०१९:एक आढावा | डॉ. संजय गोरे | 61 |
| 11 | १४ वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुक विश्लेषण २०१९ | डॉ. ए. डी. जाधव | 67 |
| 12 | राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्षाचे बदलते स्वरूप | डॉ. बाळासाहेब जोगदंड | 73 |
| 13 | निवडणूक रणनीती आणि डावपेच' | एन. आर. कन्हाके | 78 |
| 14 | १४ वी महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक २०१९ : खंडित जनादेश | डॉ. विजय काळे | 82 |
| 15 | भारतीय लोकशाही : निवडणुका आणि मतदारांना मिळालेला नकाराधिकार | डॉ. राजेंद्र कोरडे | 88 |
| 16 | महाराष्ट्र विधानसभा निवडणुक – २०१९ एक विश्लेषण | प्रा. लोमेश बावनकुळे | 94 |
| 17 | महाराष्ट्रीय राजकारणात १४ व्या विधानसभेचा खंडीत जनाधार | डॉ. एम. जी. मेश्राम | 97 |
| 18 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक : एक आढावा | नागेश महाडिक | 105 |
| 19 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ च्या विदर्भातील निकालाचे राजकीय विश्लेषण | डॉ. मंगेश आचार्य | 109 |
| 20 | वर्धा : भाजपाचे वर्चस्व | डॉ. प्रमोद आचेगावे | 114 |
| 21 | गोंदिया जिल्हातील २०१९ मधील विधानसभा मतदारसंघातील निवडणुकांचे विश्लेषणात्मक अध्ययन | अमोल सातपुते | 117 |
| 22 | महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २०१९ चे अध्ययन (विशेष संदर्भ रिसोड विधानसभा ) | डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर | 123 |
| 23 | सातारा विधानसभा मतदार संघाचा आढावा | डॉ. सागरकुमार जाधव | 129 |
| 24 | कोल्हापूर दक्षिण विधानसभा निवडणूकीचा आढावा | डॉ. राहुल नागुर्डेकर | 133 |
| 25 | सांगली विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत राजकीय पक्षाच्या वर्चस्वाचा आढावा (१९९५-२०१९) | दौलत साळवी | 136 |
| 26 | विधानसभा निवडणूक २०१९–पूर्व विदर्भातील निवडणुकीचे विश्लेषण | डॉ. नंदाजी सातपुते | 141 |
| 27 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण २०१९ (विशेष संदर्भ : भंडारा जिल्हा विधानसभा क्षेत्र) | डॉ. विजया राऊत | 144 |

ISSN : 2348-7143
February-2020

# महाराष्ट्रीय राजकारणात १४ व्या विधानसभेचा खंडीत जनाधार

प्रा. डॉ. एम. जी. मेश्राम
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती राजकमल बाबुराव तिडके महाविद्यालय,
मौदा, जि. नागपूर.

तकदीर का बनाकर तमाशा
आसमान से सरपर नाचते हो तुम
बनाकर सरफीरे बेवकुफ कुछ
जनाजा मैय्यत का हमारे रचते हो तुम
फितरत है तुम्हारी झगडे लडाने की
घंटी बजाकर देवल से बचते हो तुम

**पक्षीय बलावलाची आकडेमोड :–**

२१ सप्टेंबरला महाराष्ट्रात १४ व्या विधानसभेसाठी निवडणूका घोषीत झाल्या. ८, ९८, ३९, ६०० मतदारांची नोंद झाली. निवडणूकीत ३, २, ३७ उमेदवारांनी भाग घेतला. भाजप व सेनेची महायुती आणि कॉंग्रेस व राष्ट्रवादीची आघाडी प्रामूख्याने आमनेसामने विरोधात होती. भाजपाने १६४ जागी उमेदवार उभे केले, त्यापैकी १०५ जागी उमेदवार निवडून आले. उमेदवार विजयाची टक्केवारी ६५: अशी होते. शिवसेनेनी १२४ उमेदवारांना रिंगणात उतरविले. त्यापैकी ५६ उमेदवार विजयी झाले. त्या विजयी उमेदवारांची टक्केवारी ४५: होती. असे निदान भाजपाने गृहित धरून मुख्यमंत्रीपदाची दावेदारी लावून धरली. ३००१ पुरूष उमेदवारीपैकी २४१८ उमेदवारांची तसेच २३५ स्त्री उमेदवारांपैकी १८९ उमेदवारांची जमानत जप्त झाली. अर्थात ८०.५६ लोकांची जमानत जप्त झाली. वंचित बहुजन आघाडीमुळे महाआघाडीच्या २३ जागांवर प्रभावामुळे पराभवाची पाळी आली. भाजपाचा ५९ जागांवर पराभव झाला. त्यापैकी ५५ जागांवरील उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर आहेत. भाजपला १.४१ कोटी म्हणजे २५.७५ टक्के मते मिळाली. शिवसेनेला ९० लाख म्हणजे १६.४१ टक्के मते मिळाली. कॉंग्रेसला ८७.४२ लाख म्हणजे १५.८७ टक्के मते मिळाली. राष्ट्रवादीला ९२.१६ लाख मते मिळाली. म्हणजे १६.७२ टक्के मते मिळाली. मनसेला १२.४० लाख म्हणजे २.२५ टक्के मते मिळाली. मनसेचा एक उमेदवार विजयी झाला. एम.आय.एम. चे २ आमदार झाले. ७.३६ लाख मते मिळाल्याने मतांची टक्केवारी १.३४ टक्के होते. शिवसेना–भाजप महायूतीला १०५५६त्र१५९ जागा मिळाल्या. दोन्ही पक्ष मिळून प्राप्त १५९ जागा निवडणूकीच्या असल्या तरी सत्ता स्थापनेसाठी होत्या असे मानता येईल? मात्र निवडणूक यूती तूटल्यावर त्या निश्चितपणे सत्तास्थापनेसाठी राहू शकत नाही. यूती वैचारीक एकोप्याने होते. वैचारीक मतभेद झाल्यावर व्यावहारीक मतभेद उद्‌भवतात. राष्ट्रवादीने स्वतःच्या ५४ आमदारासह शिवसेनेच्या ५६ सोबत जावून निरूपयोग होता. कॉंग्रेसच्या पाठींब्याशिवाय सरकार स्थापन करणे अशक्यप्राय होते. अपक्ष १३ सोबत घेतले तरीही निरूपयोग होता. भाजप मात्र १०५ सोबत राष्ट्रवादीचे ५४ आमदार सोबत घेवून शासन बनवू शकली असती. परंतु शरद पवारांची धोरणी भुमिका आणि राजकीय धुर्तता अडचणीची ठरली. कौरव पांडवांचे सत्तात्मक संघर्षातून उफाळलेले महाभारत १८ दिवसात संपले. श्रीकृष्णाची दिव्यशिष्टाईसुध्दा निकामी ठरली. मात्र महाराष्ट्रातील १४ व्या विधानसभेचा सत्तासंगर ३५ दिवसानंतर संवैधानीक पध्दतीने रीतशीर तडीस गेला. शरद पवार भाजपच्या आभासी लॉलीपापला बळी पडले नाही. महाराष्ट्राचे इंद्रप्रस्थ नतद्रष्ट कुतरओढ संपली.

Babnrao Tidke
SEAL
Principal
Smt Rajkamal Baburao
Mahavidyalaya Mou

होवू दिले नाही. महाराष्ट्रावर इंद्रप्रस्थ (दिल्ली)चा प्रादूर्भाव पडू दिला नाही. अफजलखानाचा प्रेमालिंगनाचा डाव वेळीच ओळखून छत्रपती शिवरायांनी जसे पोटात अलगद वाघनखे खूपसून कोथळे बाहेर काढले, तसे सर्वकाही स्थिरस्थावर केले. शरद पवारांच्या धोरणी सिध्दांतावर शंका घेण्यास आता तसूभर देखील वाव राहीला नाही. ''अब की बार २२० पार'' हा भाजपचा चूनावी होरा आता धुळीस मिळाला आहे.

जश्न इनका स्वर्ग पूण्य से,
जालिम हमें हरदम छल गये।
हमारे माथे पाप का हिस्सा,
खुद को मगर भगवानसे तोल गये।
बाल की खाल निकालना आदत इनकी,
कहते है देव इनसे खुद बोल गये।

**राष्ट्रवादीचे अंतर्द्वंद :—**

बहुमताचा पाठींबा नसतांना देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री बनले. बहुमत सिध्द करण्यासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी त्यांना कोणती तारीख दिली, हे राजभवनातून निश्चितपणे स्पष्ट झाले नाही. अजित पवारांसोबत गेलेले सर्व आमदार परत आले. बहुमतासाठी फडणवीसांनी हास्यास्पद ऑपरेशन लोटसचा घाट घातला. विधानसभेचे अध्यक्षपद बळकावण्यासाठी मोहीम आखली. आता शरद पवारांच्या प्रतिष्ठा आणि भूमिकेला संभ्रमाने घेरले. मात्र त्यांनी जिकरीने शर्त पणाला लावली. ''काळजी करू नका. मी सोबत आहे'' असा उध्दव ठाकरेंना फोन करून धीर दिला. ज्येष्ठ विधीज्ञांशी सल्लामसलत केली. अजित पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झालेली होती. निवडून आलेल्या आमदारांच्या स्वाक्षऱ्या असलेले तत्संबंधी पत्र त्यांच्याकडे होते. ते पत्र अजित पवारांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या संमतीसाठी नव्हते. अजित पवारांची भुमिका पक्षशिस्तभंगाची ठरवून राष्ट्रवादी पक्षाने त्यांना त्या पदावरून निष्काषीत केले. सिंचन घोटाळयावरून अजित पवारांवर टिकेची झोळ उठविणारे भाजपाई मंडळी सत्तास्थापनेसाठी त्यांचेच सहाय्य घेण्यास तिळमात्र गैर मानत नाही. शरद पवारांनी गंभीरपणे पुरोगामी भूमिका घेतली. प्रतिगाम्याच्या जाळात गेलेल्या अजित पवारांना 'ते' पत्र बैठकीचे होते असे ठणकावून बजावले. १९९५ ते २०१९ पर्यंत सलग २५ वर्षे आमदार राहीलेले, विविध महत्वपूर्ण पदे भूषविणारा धुरंधूर पुतण्या एकदम बेईमानी करणार नाही, अशी प्रयत्नांची शिकस्त शरद पवारांनी केली. मुलतः विजयसिंह मोहिते पाटील आणि छगन भुजबळ यांना मिळालेल्या उपमुख्यमंत्रीपदापासून त्यांची पक्षात धुसफूस सुरू होती. राज्य शिखर बॅंकेतील घोटाळा आणि सिंचन घोटाळा प्रकरणे त्यांना हैराण करत आहेत. ईडीने त्यांना नोटीस बजावल्याने ते धास्तावले होते की, पक्षविरोधात मस्तावले होते? हाही विकट प्रश्न आहे. अजित पवारांनी 'आम्हाला फसवूनच राजभवनावर नेले' असाही गौप्यस्फोट आ. राजेंद्र शिंगणे यांनी केला. अजितरावांनी सकाळी सात वाजता मिटींग असल्याचे सांगून त्यांना बोलावले होते. हा दळभद्रीपणा अश्लाघ्य अपराध आहे.

लोहे को लोहा काटता है,
हीकमत से काटनेवाला चाहीए।
लोहा रखते है नहाने पानी मे,
बस पानी छॉंटनेवाला चाहीए।
खैर ना करो इनके शातिर चाल की,

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 240 (A) : Analysis of Maharashtra State Legislative Assembly 2019
Peer Reviewed-Referred Journal
ISSN : 2348-7143
February-2020

इन्हें तो बस खैरात बॉटनेवाला चाहीए।

**नवख्यांनी काय शिकावे?**

स्वतंत्र भारतात संवैधानीक शासनप्रणालीनूसार केंद्रासाठी सांसदीय शासनप्रणाली स्विकारलेली आहे. वरीष्ठ सभागृह निरंतर राखून त्यात नव्या–जून्यांचा उत्तम मेळ घालण्यात येतो. योगायोगाने महाराष्ट्र राज्याच्या कायदेमंडळाच्या विधानसभा या कनिष्ट सभागृहात २८८ पैकी ११० आमदार पहील्यांदा निवडून आलेले आहेत. त्यात राष्ट्रवादीचे २८ म्हणजे ५४:, कॉग्रेसचे १८ म्हणजे ४३:, शिवसेनेचे १८ म्हणजे ३३: आणि भाजपचे २६ म्हणजे २५: उमेदवार विजयी झालेले आहेत. त्याशिवाय राष्ट्रीय समाज पक्ष, मनसे, प्रहार, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेकाप, माकप, बहुजन विकास आघाडी आणि समाजवादी पक्ष या आठ पक्षाचे प्रत्येकी १ पहिल्यांदाच निवडून आलेत. १३ अपक्षांपैकी १० बंडखोर आहेत. जून्यांचा अनूभव आणि नवख्यांचा उत्साह यांचा सिध्दांतशील व्यावहारीक विहंगम संगम नव्या प्रवर्तन परीप्रेक्ष्यास परामर्शदायी ठरावा ही वहीवाटीची अपेक्षा असते. महाराष्ट्राची १४ वी विधानसभा त्यायोगे परामर्शदायी ठरेल काय? हा गुंतागूंतीतून निर्माण झालेला प्रश्न गहन तितका महणीय आहे.

**घोडेबाजाराचा प्रतिबंध :–**

लोकांचे नेतृत्व करणारे नेते विकले जातात. त्यांना खरेदी केले जाते. त्यासाठी त्यांना प्रतिपक्षाच्या सावटापासून सुरक्षितस्थळी ठेवण्याची व्यवस्था करावी लागते. हे सखेदाश्वर्याचे राजकारण लोकांना फार बुचकळयात टाकणारे ठरते. एवढया मोठया प्रतिष्ठेच्या पदावर पोहोचलेले शक्तीशाली नेते स्वत:ची खरेदीविक्री करून घेतात ही बाब वेश्यागिरीपेक्षाही धोकादायक आहे. त्यासाठी सरसावलेली 'ऑपरेशन लोटस' ची भाजपाई नरवीर फौज अत्यंत निराशादायी ठरली. मात्र सत्ता, सेवा, सुरक्षा अशा सुखवस्तू दृष्टीकोनातून एका पक्षातून दुसऱ्या पक्षात बेडुक उडया मारणारे तत्वशून्य लुडबूडखोर मौलीक राजकीय व्यवस्था रसातळाला नेवून ग्लानी गटारांना ऊत आणणार हे नक्की. अजित पवार भाजपच्या गळाला कसे काय लागले? हा गहन प्रश्न आहे.

अजित पवारांना जर राष्ट्रवादीच्या ५४ पैकी ३६ आमदारांनी साथ दिली असती तर देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर निश्चित दृढमूल झाले असते. राजीव गांधीच्या कारकिर्दीत सन १९८५ साली "आयाराम गयाराम" वृत्तीवर प्रतिबंध आणण्यासाठी १/३ आमदारांचा पाठींबा असेल तरच पक्षांतर करून नवीन पक्ष स्थापन करता येईल असे ठरविण्यात आले होते. बेताल लोकांची विसंघटक प्रवृत्ती तात्वीक मुल्यांना निरंतर तिलांजली देत असते. संयम, शिस्त, सचोटी, सिध्दांत याचे त्यांना काहीही देणे घेणे नाही. ९१ व्या घटना दुरूस्तीने एकूण पक्षसदस्यांच्या २/३ पाठींब्याशिवाय नवीन पक्ष स्थापन करता येत नाही म्हणून राष्ट्रवादीतून भटकलेले अजित पवार गोत्यात अटकले.

वार करते ढाल से
तलवार मे इनके दम नहीं।
तीर से पानी–आम से बच्चे,
दुनिया जलाने मे गम नही।
हिंसा दूरी बरकरार बहुजनोंसे,
यह चोर लुटेरे, यहाँ के हमदम नहीं।

**मतदारांचा अपेक्षाभंग :–**

२४ ऑक्टोबर २०१९ रोजी महाराष्ट्रातील १४ व्या विधानसभेचा निकाल घोषीत झाला. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी उध्दव ठाकरेंचा मुख्यमंत्री पदाचा शपथविधी झाला. हया उण्यापूऱ्या एक महीन्याच्या कालावधीत राजकीय सुंदोपसुंदीची चाललेल्या मनाची प्रचंड कालवाकालव उडविणारी होती. जननिर्णय राजकीय अस्थैर्याच्या कचाट्यात तुंबले होते. जनतेचा मनोभंग होत होता. मतदार उद्विग्न होता. हा मतदारांचा जघन्य मानभंग न्यायासाठी कोणत्या न्यायालयात प्रविष्ट करावा? हा मुद्दा ऐरणीवर होता. आम्ही ज्यांना शहाणे–सूर्ते म्हणून निवडून दिले ते २८८ पैकी १४५ एकत्रित होवून राज्याच्या हितार्थ त्वरीत निश्चित ठाम निर्णयापर्यंत पोहोचू शकत नाही. हे राजकीय एकोप्याचे अघोरी दुर्भिक्ष फुले–आंबेडकर–शाहुच्या महाराष्ट्रात बेशरमकीच्या सर्व सीमा पार करणारे ठरले. अशा नालायकीच्या डोंगरावर निवडून आलेल्या समस्त आमदारांची आमदारकी रद्दबातल करून नव्याने निवडणूका घ्याव्यात असे जनतेला वाटू लागले होते. परंतु नव्याने निवडणूका घेणे राज्याला परवडणारे नव्हते. नव्याने उमेदवाऱ्या लढविणे नेत्यांना देखील "नाकापेक्षा नथनी जड" ठरले असते. म्हणून फक्त पक्षांतर करणाऱ्यांचे सदस्यत्व रद्द करता येईल काय? त्यासाठी कसा कायदा बनविता येईल. याकडे राज्याच्या कायदेमंडळाने लक्ष देणे अगत्याचे आहे.

अजित पवारांनी राज्यपालांची फसवणूक केली काय? त्यांना उपमुख्यमंत्री पद हवे होते काय? भाजपाने ईडीची चौकशी लावली तर काय होईल? या प्रश्नाने ते ग्रासले होते काय? भाजप सत्ता स्थापनेसाठी राबवित असलेल्या व्यूहनीतीचे ते शिकार बनले काय?

**राजकीय सुंदोपसुंदी –**

भाजप आणि शिवसेना यांच्यात प्रमोद महाजनांच्या युक्तीने १९८९ च्या लोकसभा निवडणूकीत यूती झाली. अटलबिहारी वाजपेयी आणि बाळासाहेब ठाकरे आता हयात नाहीत. प्रमोद महाजन, गोपिनाथ मुंडे यांचे विदारक मृत्यू झाले. १९९५ मध्ये शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. १९९८, १९९९ मध्ये वाजपेयी शासनात शिवसेना दिमतीस होती. इतर पक्षांनी साथ सोडली. शिवसेना सदैव सोबत राहीली. भाजपचे अध्यात्मिक राजकारण फोफावत गेले. गोहत्या बंदी कायद्यावरून बिनसले. शिवसेनेचे महाराष्ट्रातील सामाजिक राजकारण अडचणीचे ठरत होते. 'हिंदुत्व' हा धर्म नाही असा न्यायालयाने निर्वाळा दिला, ती जीवनपध्दती आहे, असे सूर आळविण्यात येताहेत. वैदिक सनातनी धर्माने हिंदूत्वाची झूल ओढली. महाराष्ट्रात संताचे मानवतावादी हिंदुत्व त्याविरूध्द बंडखोरीचे दिसते. छत्रपती शिवाजी महाराज "रयतेचे राजा" की "गो ब्राम्हणप्रतिपालक" अशी ही हिंदुत्वाची स्पष्ट भेदरेषा आहे. १३ व्या विधानसभेत भाजपा शिवसेना संघर्ष उफाळला, तेव्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस भाजपला सरकार स्थापनेसाठी मदत करण्यास तयार होती.

शरद पवारांनी १९७८ मध्ये बंडखोरी करून पुलोद सरकार स्थापन केले होते. कॉंग्रेसमध्ये पुरोगामी–प्रतिगामी, परंपरावादी–प्रवर्तनवादी सर्वांचा जमावळा होता. हयातून अनेकजण सोयीने बाहेर पडले. गरजेनूसार नव्यांना दाखल केले. नवी अभिसरणे, नवी समीकरणे करण्याचा अनेकांनी प्रयोग केला. शरद पवारांनीदेखील तसे प्रयोग केले. भाजपाचे हिंदुत्व शिवसेनेच्या हिंदूत्वापेक्षा वेगळे आहे. किमानपक्षी ते शिवसेनेला धोकादायक आहे हे पटवून देण्यात सफल झाले. शिवसेनेने राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत प्रतिभाताई पाटील, प्रणव मुखर्जी यांच्यासाठी सहाय्यभूत भूमिका घेतली. राष्ट्रपती राजवटीच्या दरम्यान इंदिरा गांधीना साथ दिली. या पार्श्वभूमीवर आक्रस्ताळी भाजपला रोखण्यासाठी शिवसेनेला साथ देण्यास हरकत असू नये, असे सोनिया गांधीसह ज्येष्ठ कॉंग्रेसी नेत्यांना पटवून दिले आणि उध्दव ठाकरेंना मुख्यमंत्री बनवून शिवसेनेचे खरे

हिंदुत्व व भाजपाचे दांभिक हिंदुत्व राजकारणाच्या ऐरणीवर आणले. भाजपाची विजिगीषू घोडदौड रोखण्याचा मुहूर्त रोवला.

भादू बनाये चादू,
घोदू सजाये पत्थर।
विज्ञानयुग में पैदा बेवकुफ,
इनसे तो झाडूवाला बेहत्तर।
सबका स्वास्थ्य रखे सलामत,
शक्तिमान उनसे राष्ट्रीय स्तर।

**राज्यपालाची भूमिका –**

राज्यपाल हा राज्याचा घटनात्मक शासनप्रमूख आहे. तो राष्ट्रपतीचा प्रतिनीधी म्हणून राष्ट्रीयभाव जोपासणारा व अराष्ट्रीय व्यवहार–तत्वांना जेरबंद करण्यासाठी मोलाची भूमिका बजावू शकतो. अर्थात त्यासाठी त्याच्या ठायी पक्षपातविरहीत विवेकबुध्दी असणे अनिवार्य आहे. कलम ३५६ नूसार जर राज्यात घटनात्मक शासनाची अयशस्वीता उदभवल्यास राष्ट्रपती राजवट (आणीबाणी) घोषित करण्याची राष्ट्रपतीकडे शिफारस करावी अशी तरतूद आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे १३ आमदार सोबतीला ठेवून देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी २३ नोव्हेंबर २०१९ रोजी सकाळी ७.४५ वाजता अनुक्रमे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मत्र त्यांचा शासनकाळ अवघ्या ७९ तासाचा ठरला. सत्ता–स्थापनेचा हा हीनकट प्रकार फार लाजिरवाणा होय. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी संविधानाच्या कलम ३५६ (२) अन्वये स्वत:च्या अधिकारात राष्ट्रपती राजवट उठविण्याचा निर्णय घेतला. राज्यपाल बी. एस. कोश्यारी यांनी मध्यरात्री राष्ट्रपती राजवट हटविण्याची शिफारस केली.

केंद्रीय गृहमंत्रालयाने ही शिफारस फॅक्स आणि ई–मेलच्या माध्यमातून राष्ट्रपतीकडे पाठविली. दि. १२ नोव्हेंबर २०१९ रोजी लागू केलेली राजवट हटविण्यासाठी राष्ट्रपतींनी शनिवारी पहाटे ५.४७ मिनीटांनी आदेश जारी केला. राष्ट्रपती राजवट लागू करतांना ज्याप्रमाणे केंद्रीय मंत्रिमंडळाने शिफारस लागू करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे ती हटवितांना सुध्दा केंद्रीय मंत्रिमंडळाने शिफारस केली पाहीजे. कारण भारतीय शासनप्रणाली अध्यक्षीय नसून सांसदीय आहे. येथे सामुदायिक जबाबदारीचे तत्व महत्त्वपूर्ण मानण्यात येते. तातडीचा निर्णय असल्याच्या सबबीखाली नियमानूसार नोटीस देवून सर्व मंत्रिमंडळाची बैठक शक्य नव्हती. परंतु राष्ट्रपती राजवट हटविल्याशिवाय शपथविधी घेता आला नसता म्हणून असा आततायी उठाठेव करण्यात आला. अर्थात भगतसिंह कोश्यारीच्या माध्यमातून राष्ट्रपतीमार्फत मार्ग मोकळा करून स्वत:च्या पक्षाचे सरकार स्थापन करण्यासाठी पंतप्रधान मोदींच्या केंद्र सरकारने व्युहनीती आखली. एकदा सरकार स्थापन केले की, शासकीय सत्तेच्या जोरावर सत्तालोलूप लोकांना सत्तेचे गांजर दाखवून, काहींना भय दाखवून, काहींना दडपणात आणून बहुमताचा आकडा साधता येईल, असा त्यांचा कयास असावा. दरम्यान राज्यपाल आणि नायब राज्यपाल यांची दिल्लीत दोन दिवसीय परीषद घेण्यात आली. बदलत्या काळात राज्यपालांची भुमिका अधिक महत्त्वाची असे राष्ट्रपतींनी प्रतिपादन केले.

केवळ घटनेचे संरक्षण करणे एवढेच राज्यपालांचे मर्यादीत काम नाही. आपल्या राज्यातील लोकांच्या सेवेत सातत्याने कार्यरत राहण्याशी त्यांची बांधीलकी आहे. अंतिमत: आपण सगळेच लोकांसाठी काम करतो. आपण लोकांना उत्तरदायीही आहोत, असे निक्षून सांगण्यात आले. महाराष्ट्रात कोश्यारींनी अजित पवार यांच्या

ISSN : 2348-7143
February-2020

उपमुख्यमंत्र्याच्या शपथविधीला शनिवारी २३ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेसने आव्हान दिले. यात राष्ट्रपती व राज्यपालाची भुमिका उत्तरदायित्वाची की घिसाडघाईची? अर्थात राष्ट्रपती व राज्यपाल पदाचा वापर कळसूत्री बाहुल्यांसारखा केंद्रसरकारने स्वतःच्या पक्षसोयीखातर केलेला निदर्शनास येतो. राष्ट्रपती राजवट उठविण्याची विनंती शुक्रवारी मध्यरात्रीनंतर केली होती. त्यावेळी मंत्रिमंडळाची बैठक घेणे शक्य नसल्याने केंद्र सरकारच्या कामकाजविषयक नियमावलीतील नियम १२ अन्वये पंतप्रधानाच्या विशेषाधिकाराचा आधार घेण्यात आला. या नियमानुसार विशेष परीस्थितीत नियम पूर्णपणे बाजूला ठेवण्याचा किंवा त्यात फेरबदल करण्याचा विशेषाधिकार पंतप्रधानांना आहे.

संघराज्य म्हणजे संघराज्य. संघराज्य की राज्यसंघ? हा वाद नाकारून "India that Bharat shall be a Union of State" असे संविधानाच्या पहील्याच कलमात बजावले आहे. संघ महत्वाचा. राज्यपाल परीषदेत सहकारी संघराज्य आणि स्पर्धात्मक संघराज्य असा नवा सूर नरेंद्र मोदींच्या शासकीय सूरने घेतलेला दिसतो. सहकारी संघराज्य म्हणजे केंद्र आणि राज्य सरकारांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना सोबत घेवून एकसमान धोरणावर काम करणे आणि स्पर्धात्मक संघराज्य म्हणजे राज्यांनी परस्परांशी, केंद्राशी स्पर्धा करणे होय. मुल्ये, सिध्दांत, आदर्श, तत्वे कितीही उदात्त आणली तरी ते अंमलात आणणारे तितकेच नीती आणि नियतीने कृती आणि कृतीने प्रामाणिक असणे अनिवार्य असते. आपले संविधान लवचिक, ताठर, समर्थ, सक्षम आहे. परंतु त्याप्रमाणे काही सुरळीत चालत नसेल तर त्याला कारण आमच्या राज्यघटनेतील दोष नसून, मनुष्य समाजातील अधमपणा हाच असेल हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निक्षून सांगितलेले विधान पुन्हा पुन्हा स्मरणात घेणे आवश्यक आहे. स्वत: आमदारांची मोजदाद करून राज्यपाल बहुमत ठरवू शकत नाही. सरकारने स्वतः विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकणे याशिवाय तरणोपाय नाही. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ च्या एस. आर. बोम्मई प्रकरणात तसा निर्वाळा दिला होता.

निवडणूकीत कोणत्याच पक्षास अगर आघाडीस स्पष्ट बहुमत नसल्यास कोणाला पाचारण करावयाचे हे राज्यपालाच्या स्वविवेकावर अवलंबून असते. त्यासाठी सार्वत्रिक चर्चा घडवून प्रथमदर्शनी कोणाला बहुमताचा पाठींबा मिळू शकेल याचा अदमास घेणे कठीण नाही. राज्यपालाने लहरी वृत्तीने मनमानीपणे निर्णय घेणे समुचित नाही. आमदारांच्या पाठींब्याचे पत्र घेण्याची प्रथा प्रस्थापित झालेली आहे. हे सांगणे न लगे. राज्यपाल आमदारांचे स्वतंत्र वा एकत्रित पत्र घेवू शकतात.

अजित पवारांसोबत जाणारे राष्ट्रवादीचे राहणार नसून ते बंडखोर ठरणार होते आणि अंततोगत्वा अजित पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेसने गटनेतेपदावरून हकालपट्टी केल्यावर राज्यपालाच्या ध्येयधोरणाचा चुराडा झाला. राज्यात १८ दिवसांत बहुमत दाखवून सत्तास्थापनेचा दावा करणे शक्य होते. कुणालाच ते शक्य नसल्याचे स्पष्ट झाल्याने राज्यपालांनी राष्ट्रपती राजवटीची शिफारस केली. तरी पक्ष वा पक्षांची आघाडी राज्यपालाकडे सत्तास्थापनेचा दावा करू शकते. महाराष्ट्रात महायुती जिंकेल आणि देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील अशीच आमची भूमिका होती. पंतप्रधान मोदी व मी तसे जाहीर केले होते, असे भाजपाध्यक्ष अमित शहा यांनी स्पष्ट केले आणि निवडणूकांच्या आधी काय ठरले होते, बंद दाराआड काय चर्चा होते, हे सांगायचे नसते. ती आमची संस्कृती नाही, असे स्पष्टपणे बजावले.

राज्यपालांनी सुध्दा भाजपविहीन नवीन सरकार स्थापनेस अनुमती दिली तथापि पाठींबा देणाऱ्या आमदारांचे निळया शाईतील सहीचे स्वतंत्र पत्र सादर करावे. तसेच आमदारांच्या सहया जबरदस्तीने किंवा अन्य माध्यमातून घेण्यात आलेल्या नाहीत. असे प्रमाणित करण्यासाठी शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्यांची

प्रतिस्वाक्षरी असावी, अशी अट घातली. आमदारांची ओळख परेड घेण्यास मात्र नकार दिला. आपापल्या पक्षाच्या प्रत्येक आमदाराच्या पाठींब्याचे सहीनिशी पत्र सादर करण्यास या पक्षाच्या नेत्यांना सांगितले. पूर्वीच्या काही राज्यपालांनी हीच पध्दती अवलंबिली होती. त्यामूळे पक्षांचा नाईलाज झाला. राज्यपालांनी देवेंद्र फडणवीसांना ७२ तासाचा अवधी दिला होता. तसा शिवसेनेला का दिला नाही? शिवसेनेला फक्त २४ तासाचा अवधी देवून दळभद्री करंटेपणा योजिलेला दिसतो. अन्यथा महाराष्ट्राच्या पोटी अवघ्या ७९ तासाचे घटोत्कट मुख्यमंत्री बाळ जन्माला येण्याची दैन्यावस्था आलीच नसती.

किनारे लगाना आसान हैं,
मुश्कील है नैय्या चलाना मजधार सें।
अगर रखना हैं, वजूद सलामत,
तो तरकीब सिखना जनाब शरद पवार सें।

निष्कर्ष :

१. स्पष्ट बहूमताचा ताळमेळ नसतांना काहीही करून सत्ता प्राप्त करण्याचा भाजपने टाकलेला डाव अयशस्वी झाला. राजनीतीचा विजय झाला. व्यूहनीतीचा पराभव झाला.
२. अमित शहा, नरेंद्र मोदी अशा शक्तिशाली राजकारणी लोकांचे छत्र असूनही देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री पद प्राप्त करू शकले नाही. अर्थात राजकीय दंडेलकीला सर्वत्र मनस्वी शरणार्थी मिळत नाही.
३. संभ्रमाच्या राजकारणात दलबदलू बंडखोरांनी संयत भुमिका अंगिकारली पाहीजे. पक्षीय विकृतीला त्यामूळे आळा बसतो.
४. सिध्दांतहीन सत्तालोलूप राजकारण डावपेचाच्या आटापिट्याने वैचारीक संभ्रमाचे वावटळ निर्माण करते. लोकांमध्ये नैराश्य उद्‌भवते.
५. राज्यपाल महाआघाडीला 'पाठींब्याचे स्वतंत्र पत्र सादर करा' असा निर्देश देतात. तसे महायूतीबाबत केले नाही. यामूळे त्यांची भूमिका पक्षपाताची वाटते.
६. दडपणूकीचे तकलादू राजकारण सैध्दांतिक दृष्टीकोनातून संवैधानीक मार्गाने खंबीरपणे उलथावून लावता येते. मुत्सद्देगिरीने शरद पवारांनी ते शक्य करून दाखविले.
७. कॉंग्रेसची वस्तुनिष्ठ लोकशाहीमूलक सनदशीर भुमिका यथार्थवादी इतिसार्थकांसाठी सहाय्यभूत ठरली.
८. दंतकथेतील विकासाच्या मानगुटीवरील घडावू वेताळ उतरणे प्राय: शक्य नाही. मात्र महाराष्ट्रीयन राजकारणाच्या सत्यस्थितीला शिवसेनेच्या मानगुटीवरील अध्यात्मिक धर्माचा चढावू वेताळ उतरविण्यात पूरोगामी नेत्यांना यश मिळालेले आहे.
९. अकारण राष्ट्रपती राजवट प्रस्थापित करून भाजपने प्रतिपक्षांना अडचणीत आणले असते. ते टाळता आले.

उपाय :–

१. बहुमताची खातरजमा ठेवूनच सत्ता स्थापन करावी.
२. राज्यपालाने पक्षीय हितापेक्षा, लोकहीत–राष्ट्रहित महत्वपूर्ण मानावे.
३. सत्तेसाठी पक्षांतर करणारांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर कायदा बनवावा.
४. पक्षांतर करणाऱ्यास सत्तेत सामावून घेण्यास मज्जाव करणारा कठोर कायदा बनवावा.

५. वैयक्तिक पाठींब्याचे छापील नमूनापत्र प्रत्येकांकडून भरून घ्यावे.

६. पक्षांतर करणारांची उमेदवारी रदद् करता येवू शकते काय? याचा विचार करावा.

७. राज्यपालाने राज्यप्रमूख म्हणून काम पहावे. राज्याच्या कारभारात अधिक्षेप करू नये.

८. बहुमताचा तिढा निर्माण झाल्यास संविधान तज्ञ व अभ्यासू विश्लेषकांची खुली चर्चा घडवून परामर्श घ्यावा.

९. मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी जाहीरपणे घोषित करून सार्वजनिकरित्या समारंभपूर्वक पार पडावा.

१०. मुख्यमंत्रीपदासाठी पाचारणाबाबत राज्यपालाने आडपडदा राखू नये. तडकाफडकी, पक्षपाती, आततायी निर्णय घेवू नये.

११. तीन पेक्षा अधिक वेळा पक्षांतर करणाराला निवडणूकीत उमेदवारी घेण्यास प्रतिबंध असावा.

१२. पक्षांतर करणाराची आमदारकी रदद् करावी असे संबंधित पक्षाने ठरावानूगत विनंतीवजा पत्र दिल्यास आमदारकी रदद् करावी.

प्रतिस्वाक्षरी असावी, अशी अट घातली. आमदारांची ओळख परेड घेण्यास मात्र नकार दिला. आपापल्या पक्षाच्या प्रत्येक आमदाराच्या पाठींब्याचे सहीनिशी पत्र सादर करण्यास या पक्षाच्या नेत्यांना सांगितले. पूर्वीच्या काही राज्यपालांनी हीच पध्दती अवलंबिली होती. त्यामुळे पक्षांचा नाईलाज झाला. राज्यपालांनी देवेंद्र फडणवीसांना ७२ तासाचा अवधी दिला होता. तसा शिवसेनेला का दिला नाही? शिवसेनेला फक्त २४ तासाचा अवधी देवून दळभद्री करंटेपणा योजिलेला दिसतो. अन्यथा महाराष्ट्राच्या पोटी अवघ्या ७९ तासाचे घटोत्कट मुख्यमंत्री बाळ जन्माला येण्याची दैन्यावस्था आलीच नसती.

किनारे लगाना आसान है,
मुश्कील है नैय्या चलाना मजधार से।
अगर रखना है, वजूद सलामत,
तो तरकीब सिखना जनाब शरद पवार सें।

निष्कर्ष :

१. स्पष्ट बहूमताचा ताळमेळ नसतांना काहीही करून सत्ता प्राप्त करण्याचा भाजपने टाकलेला डाव अयशस्वी झाला. राजनीतीचा विजय झाला. व्यूहनीतीचा पराभव झाला.
२. अमित शहा, नरेंद्र मोदी अशा शक्तिशाली राजकारणी लोकांचे छत्र असूनही देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री पद प्राप्त करू शकले नाही. अर्थात राजकीय दंडेलकीला सर्वत्र मनस्वी शरणार्थी मिळत नाही.
३. संभ्रमाच्या राजकारणात दलबदलू बंडखोरांनी संयत भुमिका अंगिकारली पाहीजे. पक्षीय विकृतीला त्यामूळे आळा बसतो.
४. सिध्दांतहीन सत्तालोलूप राजकारण डावपेचाच्या आवाभिव्याने वैचारीक संभ्रमाचे वावटळ निर्माण करते. लोकांमध्ये नैराश्य उद्‌भवते.
५. राज्यपाल महाआघाडीला 'पाठींब्याचे स्वतंत्र पत्र सादर करा' असा निर्देश देतात. तसे महायूतीबाबत केले नाही. यामूळे त्यांची भूमिका पक्षपाताची वाटते.
६. दडपणूकीचे तकलादू राजकारण सैध्दांतिक दृष्टीकोनातून संवैधानीक मार्गाने खंबीरपणे उलथावून लावता येते. मुत्सद्दूदेगिरीने शरद पवारांनी ते शक्य करून दाखविले.
७. कॉंग्रेसची वस्तुनिष्ठ लोकशाहीमूलक सबदशीर भुमिका यथार्थवादी इतिहासर्थकांसाठी सहाय्यभूत ठरली.
८. दंतकथेतील विक्रमाच्या मानगुटीवरील मडानू वेताळ उतरणे प्राय: शक्य नाही. मात्र महाराष्ट्रीयन राजकारणाच्या सत्यस्थितीला शिवसेनेच्या मानगुटीवरील अध्यात्मिक धर्माचा मडानू वेताळ उतरविण्यात पूरोगामी नेत्यांना यश मिळालेले आहे.
९. अकारण राष्ट्रपती राजवट प्रस्थापित करून भाजपने प्रतिपक्षांना अडचणीत आणले असते. ते टाळता आले.

उपाय :—

१. बहुमताची खातरजमा केल्यावरच सत्ता स्थापन करावी.
२. राज्यपालाने पक्षीय हितापेक्षा, लोकहीत—राष्ट्रहित महत्वपूर्ण मानावे.
३. सत्तेसाठी पक्षांतर करणारांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर कायदा बनवावा.
४. पक्षांतर करणाऱ्यास सत्तेत सामावून घेण्यास मज्जाव करणारा कठोर कायदा बनवावा.

- 2014 च्या तुलनेत यावेळी मतदानाची टक्केवारी कमी आहे. कारण या निवडनुकीत चारही पक्षाची निवडनुक जाहीरनामे हे परस्पराहुन फार वेगळे नव्हते. म्हणजेच महाराष्ट्रीयन जनतेला नवीन काही द्यायला पक्षाकडे काहीच नाही याची अनुभुती आली. त्यामुळे जनता उदासिन झाली व मतदानासाठी बाहेर न पडता घरातच राहणे पसंत केले.
- शहरी भागात मतदानाची आकडेवारी घटली आहे याचा अर्थ महानगरीय शहरी आणि निमशहरी मतदार निवडनुक प्रक्रियेपासुन दुर राहण्याच्या प्रयत्न करत आहेत. तर आदिवासी ग्रामिण भागातील बहुसंख्य मतदार निवडनुक प्रक्रियेत सहभागी होत आहे याचा अर्थ शहरी व शिक्षित नागरिक निवडनुकीविषयी उदासिन आहे. कदाचित सुशिक्षित बेरोजगारी हे त्याचे कारण आहे त्यासंदर्भात राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यात नामोल्लेखही नव्हता.
- निवडुन आलेले सभागृह हे पुरूषप्रधानी स्वरूपाचेच दिसुन येते कारण 92% पुरूष तर केवळ 8% (एकुण 24) महिला प्रतिनिधी आहेत. यावरून असे दिसते की, महिलांची राजकीय व्यवस्थेतील स्थिती विदारक आहे. ती सुधारण्याकरीता आरक्षणात वाढ करून त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारना करण्याची गरज आहे. कारण निवडनुकीत निवडून येण्यासाठी संपत्तीची गरज असते ही सुध्दा अनुभुती या निवडनुकीत आली. सभागृहातील 288 सदस्यांपैकी 170 पेक्षा अधिक प्रतिनिधी हे कोट्याधीश आहेत.
- झालेल्या निवडनुकीत गुन्हेगारी प्रवृत्तीचा सुध्दा बालबोला दिसून आला. निवडुन आलेल्या प्रतिनिधीत 170 लोक प्रतिनिधी कायद्याच्या भाषेत गुन्हेगार आहेत. त्यांच्यावर विविध स्वरूपाचे खटले दाखल आहेत. हे एक आव्हान लोकशाहीसमोर आहे. त्यासाठी कठोर कायदा करण्याची गरज आहे.
- झालेल्या निवडनुकीत उच्च शिक्षीत परंतु अकार्यक्षम उमेदवार सुध्दा उभे होते. त्याचा परिणाम असा झाला की, अकार्यक्षम प्रतिनिधी निवडून पाठविण्यापेक्षा NOTA चा पर्याय निवडने उचीत वाटले ही बाब प्रतिनिधीक लोकशाहीच्या गुणवत्तेसाठी चिंतेची बाब आहे.
- आलेल्या निकालात सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे एकाही पक्षाने EVM वर न घेतलेला आक्षेप (भा. प्रकाश आंबेडकर यांनी आक्षेप घेतला पण तेवढया प्रभावीपणे नाही) कोणत्याही पक्षाला स्पष्टपणे बहुमत मिळाले नसल्यामुळे तसेच सर्वांच्या हातात सत्तेची चाबी जनतेने ठेवल्यामुळे सर्वच पक्षांनी आलेल्या निकालाचे स्वागत केले. यावरून EVM वरील राजकीय पक्षांची विश्वासहर्ता वाढलेली दिसुन येते. ही बाब जगातील सर्वातील मोठी लोकशाही असलेल्या आपल्या राष्ट्रासाठी जमेची बाजु म्हणावी लागेल.

अशाप्रकारे 2019 ची महाराष्ट्र विधानसभेची निवडनुक यशस्विरीत्या अनेक अनुभवांनी पार पडली.

**संदर्भ**

1. बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी, डिसेंबर 2019
2. दै. लोकसत्ता
3. दै. लोकमत.
4. वेबसाईट
5. परिक्रमा
6. योजना मासिक